नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 13/05/2023 (शनिवार) सायंकाळ

---

## घरफोडी

**१) पो.स्टे. मौदा** :— अंतर्गत ०३ कि.मी. अंतरावरील माथनी येथे दिनांक ११/०५/२०२३ चे २३/४५ वा. ते दिनांक १२/०५/२०२३ चे ०६.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— चक्रधर पुरूषोत्तम राउत, वय ४७ वर्ष, रा. माथणी ता. मौदा व फिर्यादीच्या परीवारातले सर्व लोक फिर्यादीच्या साळयाचे लग्नाला गेले जातांनी घराच्या दरवाजाला कुलुप लावुल गेले. दि. १२/०५/२०२३ चे सकाळी ०६/०० वा. घरा शेजारी राहणारी कांचन धंदरे यांनी फोन करून सांगीतले की फिर्यादीच्या घराची खिडकी खुली आहे व मेनडोरच्या दरवाज्याचे कुलुप तुटलेले आहे. फिर्यादी हा घरी परत आला असता दरवाज्याचा कुलुप तुटलेला दिसला असता फिर्यादीच्या घरातील सामान अस्ताव्यस्त पडलेले होते व घरामधील आलमारीचे दोन्ही दरवाजे उघडे दिसले तेव्हा आलमारीत ठेवलेले १) नगदी ६०,०००/— रू २) सोन्याचे मंगळसुत्र २.५ तोळा किंमती अंदाजे ५०,०००/— ३) सोन्याचा गोप १.५ तोळा किंमती अंदाजे ३०,०००/— रू सोन्याची अंगठी ३ ग्रॅम किंमती ६०००/— रू सोन्याचे कानातले २ जोड ४ ग्रॅम किंमती अंदाजे ८०००/— रू. असा एकुण १,५४,०००/— रूपयाचा मुद्देमाल अज्ञात चोराने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सपोनि. सोनेकर ८९७५९२१७७० हे करीत आहे.

**२) पो.स्टे. उमरेड** :— अंतर्गत ०२ कि.मी. अंतरावरील मौजा हिदुस्थान इंडस्ट्रिज एम. आय. डी. सी. उमरेड येथे दिनांक २८/०४/२०२३ चे १९.३० वा. दरम्यान हिंदुस्थान इंडस्ट्रिज कंपनीतील ऑफिसमध्ये तसेच कंपनीचे शटरवर उचलुन कंपनीच्या आत प्रवेश करून १) एल सी डी टिव्ही किंमती अंदाजे १४०००/— रू २) एच पी कंपनीचे जुने लॅपटॉप किंमती अंदाजे २०,०००/— रू ३) दोन इंडस्ट्रियल मोटर किंमती अंदाजे १०,०००/— रू ४) एक केबल वायर बंडल किंमती ६०००/— रू ५) नट बोल्टच्या ४, ५ नग बोऱ्या किंमती अंदाजे ५०००/— रू. असा एकुण ५५,०००/— रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम ४५४, ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा प्रदीप चवरे मो. नं. ७७९८६६८८३८ हे करीत आहे.

## पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

पो.स्टे. सावनेर :– दिनांक ११/०५/२०२३ चे २१/३० वा. चे सुमारास पो.स्टे. सावनेर हद्दीत दोन अल्पवयीन मुले यांना कोणीतरी अज्ञात व्यक्तीने त्याचा अज्ञानतेचा फायदा घेवुन फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतून पळवून नेल्याचे फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून सदर गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोहवा संजय शिंदे ब. नं. ११६१ मो. क्र. ९८२२९३२२५३ हे करीत आहे.

## गळफास लावून मृत्यु

**पो.स्टे. सावनेर :–** अंतर्गत पतकाखेडी येथे दिनांक १३/०५/२०२३ चे सकाळी ०७.४५ वा. ते ०९.०० वा. दरम्यान **मृतक नामे– पिंटया उर्फ आशिष संतोष बांबल, वय ३१ वर्ष, रा. पतकाखेडी** याने स्वतःचे राहते घरी जुन्या घराचे छताचे फाटयाला लग्न होत नाही या नैराश्यातून ओढणीने गळफास घेवुन आत्महत्या केली आहे. तसेच मृतकाचे मोठया भावाचे सुद्धा लग्न झाले नाही.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– राहुल संतोष बांबल, वय ३३ वर्ष, रा. पतकाखेडी पोस्टे माळेगाव ता. सावनेर (मृतकाचा भाऊ) यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलीस स्टेशन सावनेर हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**